| | |
|---|---|
| MHSN130004452022 | **नियमित दिवाणी मुकदमा क्र. १५४/२०२२**<br>**निशाणी क्र. ५ वरील आदेश**<br>**(युवराज गोतपागर वगैरे वि. जितेंद्र गोतपागर वगैरे)** |

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांचेविरूध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाव्याच्या अंतीम निकालापावेतो तुर्तातुर्त ताकीद मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादी यांच्या कथनाप्रमाणे, मौजे सोनकिरे, ता. कडेगांव, जि. सांगली येथील गट क्र. ६४० अशाप्रकारे दावा व अर्ज कलम १ मध्ये विस्तृतपणे नमूद केलेली जमीन मिळकत ही या अर्जाचा विषय असून त्यांना दावा मिळकत असे संबोधले आहे.

३. वादी यांच्या कथनाप्रमाणे वर नमूद दावा मिळकत ही त्यांचे पूर्वहक्कदार वडील शिवाजी दादू गोतपागर यांची वडीलार्जित मालकी हक्क वहिवाटीची असून ते दिनांक ०७.०९.२०१८ रोजी मयत झाले आहेत. वादी व त्यांचे दोन भाऊ बापूसो व दादासो हे कामानिमित्त परगावी राहत आहेत व येऊन जाऊन दावा मिळकत वहिवाटीत आहेत. दावा मिळकतीस वारसा हक्कांची नोंद करण्याचे राहून गेले आहे.

४. तसेच दावा मिळकतीच्या कब्जेदार सदरी शंकर गणपती माने क्षेत्र ३३ आर मुदत खरेदी घेणार अशी नोंद असली तरी वादीचे पूर्व हक्कदार यांनी गहाणाचा दस्त उलटून घेतलेला आहे. त्यामुळे त्यांच्या नावाची असलेली नोंद पोकळ राहिलेली आहे. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कोणताही मालकी अथवा वहिवाटी बाबतचा हक्क संबंध नाही. दावा मिळकतीच्या पूर्व बाजूला विठ्ठल नाथा गोतपागर यांचे वेगळ्या गटाच्या मिळकतीच्या पलीकडे प्रतिवादी यांची वेगळ्या गटाची मिळकत असून त्यामध्ये त्यांची राहती घरे आहेत. दावा मिळकत ही दक्षिण उत्तर चालीची असून उत्तर बाजूचा असणाऱ्या पूर्व पश्चिम चालीचे रस्त्यालगत वादी व त्यांच्या भावांची उत्तराभिमुखी घरे आहेत. सध्या वादी व त्यांचे भाऊ दावा मिळकतीची मेहनत मशागत मालकी हक्काने करीत आहेत.

५. अशी सर्व वस्तुस्थिती असताना, दि. ०१.०६.२०२२ रोजी वादी दावा मिळकतीची मेहनत मशागत व नांगरट करत असताना प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये येवून त्यांनी गट एकत्रिकरण योजनेवेळी सदरची दावा मिळकत तुमच्या नावे नोंद झालेली आहे ती आमच्या नावे करून द्या, दावा मिळकतीतून बाहेर पडा अशी धमकी दिली व शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला. त्यावेळी प्रतिवादी यांचा प्रयत्न वादी यांनी हाणून पाडला. प्रतिवादी हे काहीही झाले तरी दावा मिळकतीत वहिवाट करणार अशी उघड उघड भाषा गावांमध्ये बोलून दाखवत आहेत.

जर त्यांची वादी यांच्या वहिवाटीस हरकत अशीच चालू राहिल्यास वादी यांना नाहक दावा मिळकतीस मुकावे लागणार आहे व त्यांचे कशानेही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे म्हणून त्यांनी प्रतिवादी यांचेविरुद्ध कब्जेवहिवाटीस प्रतिवादी यांनी स्वतः अगर अन्य इसमामार्फत वादीचे दावा मिळकतीमधील शांतमामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये अगर वादीस दावा मिळकतीमधून उसकावून लावू नये म्हणून तूर्तातुर्त मनाईची मागणी केली आहे.

६. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी १६ व ४५ वर दाखल करून अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे, वादी यांनी दावा मिळकतीला गट नंबर ६४४ च्या चतुःसीमा नमूद केलेल्या आहेत, तसेच दावा मिळकत त्यांच्या मालकीची असल्याबाबत कोणताही कागदपत्रे पुरावा या कामी दाखल केलेला नाही. वादी हे प्रतिवादी यांच्या गट क्रमांक ६४४ ला आपलीच मिळकत समजून वहिवाट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सदर मिळकत ही प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मालकीची मिळकत आहे सदर मिळकतीमध्ये वादी ये जा करण्यास व शेड बांधण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रतिवादी यांनी वादी यांना शेड न बांधण्यासाठी सांगितले असता वादी यांनी विरोध करून अरेरावीची भाषा करून भांडण करू लागले. त्यावेळी प्रतिवादी यांनी वादी यांचेविरुद्ध तंटामुक्ती अध्यक्ष सोनकिरे यांच्याकडे दिनांक ३०.०३.२०२२ रोजी तक्रार अर्ज दिला होता. त्यावेळी त्यांना गट नंबर ६४४ मध्ये न जाण्यास व शेड उभारणी न करण्यास सांगितले असता

ते वहिवाट व शेड बांधण्याच्या प्रयत्नात आहेत. वादी यांनी ते मयत शिवाजी दादू गोतपागर यांचे वारस आहेत याबाबत कोणताही पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज फेटाळून लावण्यात यावा अशी विनंती केलेली आहे

७. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीस सकृतदर्शनी केस आहे का? | नाही. |
| २. | न्यायाचे व सोयीचे समतोलत्व कोणाच्या बाजूने आहे ? | प्रतिवादीचे |
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास कशानेही न भरुन येणारे असे नुकसान कोणाचे होईल ? | प्रतिवादीचे |
| ४. | काय आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

८. वादी यांनी सदर अर्जाचे कामी खालील कागदोपत्री पुराव्याचा आधार घेतला आहे.

| **अ.क्र.** | **कागदपत्र** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | मौजे सोनकिरे ता. कडेगांव येथील गट नं. ६४० चा ८ अ | ३/१ |

| | | |
|---|---|---|
| | चा उतारा | |
| २. | मौजे सोनकिरे ता. कडेगांव येथील मिळकत क्र. ६४० चा ७/१२ उतारे | ३/२ ते ४ |

९. प्रतिवादी यांनी सदर अर्जाचे कामी खालील कागदोपत्री पुराव्याचा आधार घेतला आहे.

| अ.क्र. | कागदपत्र | निशाणी |
|---|---|---|
| १. | मौजे सोनकिरे ता. कडेगांव येथील गट नं. ६४० व ६४४ चा नकाशा | २१/१ व २ |
| २. | मौजे सोनकिरे ता. कडेगांव येथील मिळकत क्र. ६३९, ६४१, ६४३/अ, ६४४, ६४५ चा ७/१२ उतारे | २१/३ ते ७ |
| ३. | तक्रार अर्ज | २१/८ |
| ४. | गट नं. ६३८ चा उतारा | ४८/१ |

१०. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम. एस. पाटील व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्रीमती जी. एम. पोतदार यांचा युक्तीवाद ऐकला.

## मुद्दा क्र. १ करीता

११. सदर मुद्दयासंदर्भात वादीस या अर्जाचे कामी सकृतदर्शनी केस आहे

का? हे पाहत असताना सकृतदर्शनी प्रतिवादी यांनी वादी यांच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला व दावा मिळकतीमधून हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला का ? हे पाहणे आवश्यक आहे.

१२. वादी यांचे विधिज्ञ श्री. एम. एस. पाटील यांनी असा युक्तिवाद केला की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा मालकी बाबत वाद नाही. दावा मिळकत ही मूळची वादी यांचे पूर्व हक्कदार शिवाजी दादू गोतपागर यांची होती त्यानंतर ते वादी व त्यांचे भाऊ यांना वारसा हक्काने आली. दावा मिळकतीच्या सातबारा पत्रकी वादी यांच्या नावाची नोंद आहे. वादी हे दावा मिळकतीचे कब्जेदार व मालक आहेत. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नाही.

१३. याउलट प्रतिवादी यांचे विधीज्ञ श्रीमती. जी. एम. पोतदार यांनी असा युक्तिवाद केला की, वादी हे प्रतिवादी यांच्या मिळकतीला दावा मिळकत समजतात. तुर्तातुर्त मनाई अर्जाच्या युक्तीवादावेळी वादी यांना चतुःसीमा चुकल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी त्या दुरुस्त करून घेतल्या. सध्याही वादी यांच्या चतुःसिमा चुकीच्या आहेत. प्रतिवादी हे वादी यांच्या मिळकतीत ये जा करता. वादी यांच्या गटाचे नेमके ठिकाण कोठे आहे हे त्यांना माहीत नाही.

१४. अभिलेखावर दाखल सातबारा उतारा चे अवलोकन केले असता,

कब्जेदार सदरी शंकर गणपती माने मुदत खरेदी घेणार अशी ०.33 आर क्षेत्राला व शिवाजी दादू गोतपागर अशी ०.६५.१० आर क्षेत्राला नोंद असल्याबाबत दिसून येते. वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वादी यांचे पूर्व हक्कदार शिवाजी दादू गोतपागर यांची असून त्यांच्याकडून वादी व त्यांचे भाऊ यांना आलेली आहे. तसेच शंकर गणपती माने यांना वादी यांचे पूर्वकदार शिवाजी यांनी मुदत खरेदी दस्ताने काही मिळकत दिलेली होती. त्यांचे पूर्वकदार यांनी सदरचा गहाणाचा दस्त उलटून घेतलेला आहे. त्याबाबत कोणताही कागदपत्रे पुरावा वादी यांनी या कामी दाखल केलेला नाही. तसेच वादींचे पूर्व हक्कदार शिवाजी हे दिनांक ०७.०९.२०१८ रोजी मयत झाले आहेत. परंतु वादी यांच्या कथनाप्रमाणे वारसांची नोंद करायची राहून गेलेली आहे. परंतू सदर नोंद अद्यापही का करायची राहूल गेलेली आहे याचे कारण नमूद नाही तसेच त्याबाबत अर्ज केला होता किंवा कसे याबाबत कोणताही कागदपत्रे पुरावा या कामी दाखल केलेला नाही.

१५. वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीमध्ये वादी व त्यांच्या भावांची घरे आहेत परंतु सदर घरांच्या बाबत ही कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी दाखल केलेला नाही. वादी हे मयत शिवाजी यांचे वारस असल्याबाबत प्रतिवादी यांनी नाकारलेले आहे. याउलट प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे वादी हे प्रतिवादी यांच्या गट नंबर ६४४ ला दावा मिळकत समजत आहेत.

१६. दिनांक ०१.०६.२०२२ रोजी वादी हे दावा मिळकतीत मेहनत मशागत व नांगरट करत असताना प्रतिवादी हे दावा मिळकतीत येऊन त्यांनी गट एकत्रीकरण योजनेवेळी सदरची मिळकत तुमच्या नावे नोंद झालेली आहे ती आमच्या नावे करून द्या व दावा मिळकतीतून बाहेर पडा अशी धमकी दिली. वादी यांच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला तसेच प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये वहिवाट करणार अशी उघड उघड भाषा गावांमध्ये बोलून दाखवत आहेत याबाबत वादी यांच्या तोंडी कथनाव्यतिरिक्त कोणताही कागदपत्रे पुरावा त्यांनी या कामी दाखल केलेला नाही. याउलटत प्रतिवादी यांनी वादी त्यांच्या मिळकतीत ये जा करतात व जनावरांसाठी शेड उभा करत आहे म्हणून तक्रार अर्ज दि. ३०.०३.२०२२ रोजी केलेला होता. वरील गोष्टींचा विचार करता प्रथमदर्शनी वादी यांनी प्रतिवादी यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केल्याचे दिसून येते.

१७. वादी यांच्या वकीलांनी पुढे असा युक्तिवाद केला की, दावा मिळकतीच्या पूर्वेस विठ्ठल गोतपागर यांच्या मिळकतीच्या पलीकडे प्रतिवादी यांची मिळकत आहे. त्यामुळे ते वादी यांच्या कबजेवहिवाटीस हरकत अडथळा करतात. दावा मिळकतीच्या पूर्वेला गट नंबर ६३९ ची मिळकत आहे व त्यालगत ६३८ ची मिळकत आहे. सदर गट नंबरच्या सातबाराच्या उताऱ्यांचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांची नावे मिळकतीस असल्याबाबत प्रथमदर्शनी दिसून येत नाही. सबब वादी यांना विठ्ठल गोतपागर यांच्या मिळकती पलीकडे प्रतिवादी यांची मिळकत आहे

या संदर्भात वादीला सकृतदर्शनी कथन नाही.

१८. वादिने प्रसूच्या अर्जामध्ये प्रतिवादी यांनी स्वतः व आगर तर्फे इस्मानी त्यांच्या कब्जा वहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशी मागणी केली आहे. वादी यांना सदर कामी सकृतदर्शनी केस आहे व प्रतिवादी त्यांच्या कब्जेवहिवाटीत हरकत अडथळा करतात हे दाखवणे आवश्यक आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता त्याबाबत शक्यता दर्शविणारा काहीही सकृत दर्शनी पुरावा वादीने हजर केलेला नाही. याउलट प्रतिवादी यांनी दिनांक ३०.०३.२०२२ रोजी प्रतिवादी त्यांच्या मालकीच्या जमिनीमध्ये वादी अतिक्रमण करत आहेत या संदर्भात तंटामुक्ती सोनकिरे तालुका कडेगाव यांच्याकडे अर्ज दिला होता. यावरूनच वादी प्रतिवादी यांच्या मालकीच्या जमिनीमध्ये अतिक्रमण करत असले बाबतची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दावा मिळकत ही वादीयांची वडिलार्जित मिळकत आहे किंवा कसे, प्रतिवादी हरकत अडथळा करतात किंवा कसे हे चौकशीअंती ठरू शकेल.

१९. वरील सर्व परिस्थिती पाहता, दावा मिळकतीला वादी यांच्या नावाची नोंद नसल्याचे स्पष्ट होते व अध्यापही नोंदी का केलेली नाही याबाबत वादी यांनी कोणताही पुरावा या कामी दाखल केलेला नाही. तसेच प्रतिवादी यांनी वादी यांना दावा मिळकतीतून बाहेर पडा अशी धमकी दिली व कब्जेवहीवाटीस हरकत अडथळा केला असे केलेले कथन सकृत दर्शनी वस्तुस्थितीनुरूप नसल्याचे दिसते. यावरून

वादी यांना सकृत दर्शनी केस नाही असे स्पष्ट होते. म्हणून मी मुद्दे क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दा क्र. २ व ३ करीता

२०. सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीतरित्या विचारासाठी घेतले आहेत.

२१. न्यायचे समतोलत्व व न भरून येणारे नुकसान या तत्त्वांचा विचार करता अर्ज मंजूर केल्यास काय परिस्थिती होईल व नामंजूर केल्यास काय परिस्थिती होईल हे पाहणे आवश्यक आहे. प्रतिवादी हे वादी यांना कोणत्या प्रकारे हरकत अडथळा करतात हे स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे न्यायाचे समतोलत्व वादीच्या बाजूने नसून प्रतिवादी यांच्या बाजूने आहे व अशा परिस्थितीत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होणार आहे. सबब मुद्दा क्र. २ व ३ बाबत वरीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

## मुद्दा क्र. ४ करीता

२२. उपलब्ध कागदपत्रावरून, तसेच दोन्ही बाजूंच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकता व नमूद केल्याप्रमाणे वादी यांना सकृत दर्शनी कथन नसल्याचे स्पष्ट होते. तसेच न्यायाचे समतोलत्व व नुकसानीचे तत्व प्रतिवादी यांच्या बाजूने असल्याचे स्पष्ट

होते. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज नामंजूर करण्यास प्राप्त ठरतो. अर्जाचे स्वरूप पाहता खर्चबाबत आदेश नाही. सदर अर्जाच्या कामी केलेला ऊहापोह व मांडलेले निष्कर्ष या अर्जापुरतेच मर्यादित असून याकामी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवर आधारित आहेत. त्यामुळे मूळ दाव्याच्या चौकशीवेळी दोन्ही बाजूंचे पक्षकार या अर्जावरील आदेशाचा आधार घेऊ शकत नाहीत. सबब मुद्दा क्र. ४ च्या निष्कर्षादाखल खालील आदेश पारीत करत आहे.

| **आ दे श** | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात येतो. |
| २. | खर्चाबाबत आदेश नाही. |

**स्वाक्षरीत**

**(चंद्रकांत रा. पाटील)**

दि. २२/११/२०२३

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कडेगांव.